आधुनिक विचारांचे
# वर्तमान




बीड । मंगळवार, १३ एप्रिल २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : २५ । पाने : ४ । मूल्य २ ₹

# पुन्हा लॉकडाऊनचे संकट?

## कोरोना रुग्णांमध्ये सातत्याने वाढ; येत्या दोन दिवसात घेणार निर्णय

प्रतिनिधी

मुंबई : राज्यात गेल्या काही दिवसांपासून कोरोनाचे रूग्ण सतत वाढत असल्याने पुन्हा एकदा लॉकडाऊनचे संकट निर्माण झाले आहे. रुग्णसंख्या रोखण्यासाठी राज्यात सध्या कडक निर्बंध लावण्यात आले असून विकेण्ड लॉकडाऊनची घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान, परिस्थिती नियंत्रणात आणायची असेल तर राज्यात लॉकडाऊन लावला जावा अशी मागणी होत आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी देखील लॉकडाऊनच्या बाजूने भूमिका घेतली असून विरोधकांनी मात्र याला विरोध दर्शवला आहे.



मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी तज्ज्ञ डॉक्टरांचा समावेश असलेल्या टास्क फोर्सच्या सदस्यांशी चर्चा केली. कोरोनाची साखळी तोडण्यासाठी दोन आठवड्यांचे लॉकडाऊन करावे, असे मत तज्ज्ञांनी मांडले. ऑक्सिजन उपलब्धता, रेमडेसिवीर इंजेक्शनचा वापर, खाटांची उपलब्धता, उपचार पद्धती, सुविधा वाढविणे, निर्बंध लावणे, कडक दंडात्मक कार्यवाही आदी मुद्द्यांवर विस्तृत चर्चा झाली. कोरोनाची साखळी तोडण्यासाठी राज्यात लॉकडाऊन लागू करण्याचे संकेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले असले तरी ती तातडीने लागू केली जाणार नाही. वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता दोन आठवड्यांच्या कडक लॉकडाऊनची शिफारस तज्ज्ञ डॉक्टरांच्या कृती दलाने केल्याने लॉकडाऊनबाबत मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचा आदेश मुख्यमंत्र्यांनी दिला असून, येत्या २-३ दिवसांत निर्णय घेतला जाण्याची चिन्हे आहेत.गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश तसेच ज्या ठिकाणी ऑक्सिजन मोठ्या प्रमाणावर उत्पादित होतो तेथून तो तातडीने मागविण्याची कार्यवाही करावी, यावरही चर्चा झाली. रेमडेसिविरचा अती आणि अवाजवी वापर थांबविणेही गरजेचे आहे, असे मत कृती गटाने व्यक्त केले. आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी रेमडेसिवीरचा पुरवठा किरकोळ विक्रेत्यांकडून न होता ते ठोक विक्रेत्याने थेट रुग्णालयास देणे, रेमडेसिविरसंदर्भात डॉक्टरकडून अर्ज भरून घेणे, केंद्र सरकारच्या समन्वयाने पुरवठा वाढविणे यावर कार्यवाही झाल्याची माहिती दिली. सर्वांची मते जाणून घेतल्यानंतर राज्यात लसीकरण वाढविण्यासाठी महाराष्ट्राला अधिक लसींचा पुरवठा व्हावा, अशी विनंती पुन्हा पंतप्रधानांना करणार असल्याचे मुख्यमंत्री उद्धव यांनी सांगितले आहे. लसीकरणात पुढे असलो तरी आणखी गती वाढवू आणि जास्तीत जास्त जणांना लस देऊ. हे लसीकरण आगामी काळात येणाऱ्या तिसऱ्या लाटेला थोपविण्यासाठी उपयुक्त ठरेल. आता या क्षणी असलेल्या लाटेला थांबविण्यासाठी आपल्याला काही काळासाठी का होईना, कडक निर्बंध लावावेच लागतील, असे सूतोवाच ठाकरे यांनी केले.

### महाराष्ट्रात 'लॉक'शाही : देवेंद्र फडणवीस

विधासनभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात 'लॉक'शाही सुरु असल्याची टीका केली आहे. आम्ही नेहमी म्हणायचो महाराष्ट्रात लोकशाही आहे, पण आता लोकशाहीऐवजी लॉकशाही चालू आहे...म्हणजेच लॉकडाऊन. कधी लॉक करायचे...कधी अनलॉक करायचे...ठीक आहे तेदेखील आवश्यक असते. परंतू जेव्हा आपण अशाप्रकारे लॉकडाऊन करतो, लोकांचा रोजगार जातो तेव्हा किमान त्या लोकांना दिलासा म्हणून आपल्या तिजोरीतून २ रूपये दिले पाहिजेत. याचे मात्र सरकारला कुठेही भान दिसत नाही, असे ते म्हणाले आहेत.



### चर्चेअंती निर्णय : आरोग्यमंत्री राजेश टोपे

राज्यात लगेचच लॉकडाऊन लागू केला जाणार नाही. सामान्य जनतेला दोन-तीन दिवसांचा अवधी द्यावा, अशी सूचना सर्वच राजकीय नेते व व्यापारी संघटनांनी केली होती. त्यानुसार गुढीपाडवा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनंतरच लॉकडाऊनचा निर्णय घेतला जाईल. बहुधा १५ तारखेनंतर राज्यात लॉकडाऊन लागू केला जाऊ शकतो, असे राजेश टोपे यांनी सांगितले. पुढील दोन-तीन दिवसांत राज्यातील रुग्णसंख्येचा आढावा घेतला जाईल. सर्वांशी चर्चा करूनच दोन-तीन दिवसांत लॉकडाऊनचा निर्णय मुख्यमंत्री जाहीर करतील, असेही टोपे यांनी सांगितले.



## चैतन्याचा पाडवा



महाराष्ट्रात नववर्षाची सुरूवात चैत्र पाडवा म्हणजेच गुढी पाडवा या सणापासून होते. चैत्र शुक्ल प्रतिपदा हा नववर्षाचा आजचा पहिला दिवस आहे. या दिवशी गुढी उभारून नववर्षाचे स्वागत करतात. चैत्र महिन्यातच वसंत ऋतूची सुरूवात होते.

त्यामुळे निसर्गात झाडांना पालवी फुटते. निसर्गातील नवचैतन्याचा हा सण आपल्या आयुष्यातही नवी सुरूवात घेऊन येवो याची कामना करत नववर्षाच्या पहिल्या दिवशी तुमच्या प्रियजनांना, नातेवाईकांना, मित्र मंडळींना मराठी नववर्ष आणि गुढी पाडव्याच्या शुभेच्छा व्हॉट्सअॅप, फेसबूक या सारख्या सोशल मीडियाच्या माध्यमातून खास मराठमोळी ग्रीटिंग्स, शुभेच्छापत्र,

मेसेजेसच्या माध्यमातून शेअर करून या नववर्षाच्या शुभेच्छा देत मराठमोळ्या नववर्षाचा आनंद द्विगुणित करू शकतात. यंदा गुढी पाडव्याचा सण हा कोरोना व्हायरसच्या दुसऱ्या लाटेमुळे जंगी स्वरुपात साजरा केला जाऊ शकत नाही.

त्यामुळे तुमच्या मनात असूनही आज नातेवाईकांना भेटणे टाळा आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून अवघ्या एका क्लिकवर जगाच्या कानाकोपऱ्यात विखुरलेल्या तुमच्या आयुष्यातील खास व्यक्तीला गुढीपाडवा आणि मराठी नववर्षाच्या शुभेच्छा देण्यासाठी ही मराठी शुभेच्छा द्यायला नका विसरू, वर्तमानतर्फे गुढीपाडव्याच्या सर्वांना शुभेच्छा!

## फास्टट्रॅकन्यूज

### रमजानच्या पवित्र महिन्याच्या उपमुख्यमंत्र्याकडून शुभेच्छा!

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील जनतेला पवित्र रमजान महिन्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत. मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना समाजात आनंद, उत्साह, बंधुत्वाची भावना घेऊन येतो. परस्परांशी प्रेमानं, संयमानं, आपुलकीनं वागण्याची शिकवण देतो. रमजान महिन्यातली प्रार्थना आणि उपवास जीवनाकडे सकारात्मक बघण्याची दृष्टी देतात. गोरगरिबांच्या, मानवतेच्या कल्याणासाठी काम करण्याची, त्यागाची प्रेरणा देणारा हा महिना आहे. यंदाचा रमजान महिना सर्वांच्या जीवनात शांती, सुख, समृद्धी, भरभराट, आनंद, उत्तम आरोग्य घेऊन येवो, अशा शब्दात उपमुख्यमंत्र्यांनी सर्वांना पवित्र रमजानच्या शुभेच्छा दिल्या आहेत.



### १० वी आणि १२ वीच्या परिक्षा मे-जून मध्ये होणार

मुंबई : राज्यात वाढत्या कोरोनाच्या रुग्णांच्या पार्श्वभूमीवर गेल्या अनेक दिवसांपासून दहावी- बारावीच्या परीक्षांबाबत काय निर्णय होतो याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. अखेर सोमवारी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्या बैठकीत या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. कोरोनाच्या वाढत्या प्रार्दुभावामुळे दहावी-बारावीच्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यामुळे आता दहावीची परीक्षा जूनमध्ये तर बारावीच्या परीक्षा मे अखेरीस होणार असल्याची माहिती शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली आहे.




### आता कोरोना रूग्णांसाठी ३९ खाजगी रुग्णवाहिका

बीड : कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची ने-आण करण्यासाठी जिल्ह्यात ३९ खाजगी रूग्णवाहिका तत्काळ अधिग्रहित कराव्यात असे आदेश जिल्हाधिकारी रविंद्र जगताप यांनी बीड आणि अंबाजोगाई येथील उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना दिले आहेत. जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव प्रचंड वाढला आहे. दररोज ५०० पेक्षाही अधिक लोकांना कोरोनाची बाधा होत आहे. वाढत्या रुग्णसंख्येच्या तुलनेत रुग्णवाहिकांची संख्या अतिशय कमी असल्याने रुग्णांची ने-आण करण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. कोरोना रुग्णांसाठी स्वतंत्र रूग्णवाहिकांची आवश्यकता भासत होती. हिच निकड लक्षात घेऊन एकूण ३९ खाजगी रूग्णवाहिका अधिग्रहित करून त्या जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्याव्यात असे आदेश दिले आहेत.

### बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेवर प्रशासक

बीड : जिल्हा मध्यवर्ती बँकेची नुकतीच निवडणूक झाली. परंतु, संचालक मंडळाचे कोरम पूर्ण न झाल्याने नवीन संचालक मंडळ स्थापित होऊ न शकलेल्या बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर प्रशासक मंडळाची नियुक्ती झाली आहे. प्रशासक मंडळाच्या अध्यक्षपदी औरंगाबाद विभागाचे अपर आयुक्त अविनाश पाठक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपच्या ताब्यात असलेली बीड जिल्हा बँक त्यांच्या ताब्यातून घेण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसने नवीन खेळी केली होती. अनेक मतदारसंघात उमेदवारच मिळाले नाहीत. परिणामी, बीड जिल्हा बँकेवर प्रशासक नियुक्त करण्यात आले. यामध्ये प्रशासक मंडळाच्या अध्यक्षपदी औरंगाबाद विभागाचे अपर आयुक्त अविनाश पाठक यांची नियुक्ती करण्यात आली.






पाहिजेत




मे.सिंदफणा ट्रॅक्टर्स, माजलगाव

अधिकृत विक्रेते : स्वराज ट्रॅक्टर या कंपनीसाठी खालील पदे त्वरित भरणे आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | सेल्स एक्झिकेटीव्ह माजलगाव | ३ | २ वर्ष |
| २ | ऑफीस बॉय | १ | -- |
| ३ | मेकॅनिकल | ३ | २ वर्ष |

नोट : सेल्ससाठी स्वतःची टू व्हीलर असणे आवश्यक. वरील जागा त्वरित भरणे आहेत. तरी इच्छुक व्यक्तींनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

पत्ता : मे.सिंदफणा ट्रॅक्टर्स, संभाजी चौक, बायपास रोड, माजलगाव
संपर्क : 9552684384, 9529932700



संपादकीय

# कोरोनाचा धडा कधी घेणार?

कोरोनाच्या वाढत्या प्रकोपामुळे अधिकच चिंता वाढली आहे. देशात गेल्या वर्षापासून कोरोनाने अनेकांना धडा शिकवला. त्यातून अनेकांना शहाणपण आले; परंतु प्रशासन आणि राज्यकर्ते त्यातून काही शिकले नाहीत. कोरोनाचा वाढता संसर्ग पाहता वारंवार लॉकडाऊनचा इशारा देणारे सत्ताधारी आणि लॉकडाऊनला समर्थ पर्याय न देता केवळ विरोध करणारे विरोधक यांच्या राजकारणात कोरोनाविरोधातल्या ठोस उपाययोजना रेंगाळत राहिलेल्या दिसतात. कोरोनाच्या पहिल्या लाटेपेक्षा दुसरी लाट अधिक गांभीर्याने घ्यावी, अशी परिस्थिती आहे. त्याचे कारण संसर्ग फोफावणे, वाढता मृत्युदर आणि कोरोनामुक्तांचे घटलेले प्रमाण पाहता चिंता वाटावी, अशी स्थिती आहे. एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यात तर एक लाखांपेक्षा अधिकजणांना दररोज बाधा होण्याची साधार भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली. देशात दररोज ऐंशी हजारांहून अधिक कोरोनाबाधित आढळले आहेत. त्यामुळे आता लॉकडाऊन करण्याचा जुनाच मार्ग सरकार चोखाळत आहे. आपल्या शेजारचा तैवान तसंच न्यूझीलंडसारख्या देशांनी कोरोनावर मात केल्याची उदाहरणे आहेत. त्यांचा धडा गिरवायचे सोडून आपल्याकडे प्रशासन हतबल झाल्याचं दिसत आहे. गेल्या एक वर्षाच्या अनुभवातून प्रशासन आणि शासनही कोणताही धडा शिकलेलं नाही. सक्रिय कोरोना रुग्णांच्या आकडेवारीमध्ये देशात टॉप टेनमध्ये असलेल्या पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, नांदेड, अहमदनगर या आठ जिल्ह्यांमध्ये निर्बंध लागू करण्यात आले आहेत. लॉकडाऊन हा शब्द न वापरता राज्यकर्ते आता निर्बंध लावत आहेत. सरकारी कार्यालये वर्क फ्रॉम होम' पध्दतीने चालू आहेत. रात्रीची संचारबंदी लागू करण्यात आली आहे. पण निर्बंध लावल्यानंतरही गर्दी वाढत आहे. त्यामुळे कडक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. संसाधने संपतात त्यावेळी संसर्गाची साखळी तोडण्यासाठी तातडीचा इलाज म्हणून लॉकडाऊन हा उपाय असतो. लोक स्वयंशिस्त पाळत नसल्याने निर्बंध कडक करावे लागत आहेत, असे प्रशासन सांगते. तरुणांमध्येही ऑक्सिजन बेड्सची मागणी वाढत आहे. बेड्सची आवश्यकता नसलेल्यांनी अतिदक्षता विभागाचा बेड घेऊ नये एवढे पथ्य पाळले, तर खाटांची टंचाई निर्माण होणार नाही. पुण्यात निर्बंध लावणे गरजेचे होते, तरी त्यासंदर्भात उमटलेली तीव्र प्रतिक्रिया पाहिली, तर अन्य ठिकाणीही कठोर निर्बंध लादण्याऐवजी अन्य काही पर्यायांचा विचार करावा लागेल. लग्नसराई आणि लोकलमध्ये होणाऱ्या प्रवाशांच्या गर्दीने कोरोनाबाधितांची संख्या वाढल्याचं सांगितले जाते. त्यामुळे आता लग्नांवर काही दिवसांसाठी बंदी घालण्यात आली आहे तर लोकलबाबतही आढावा घेण्यात आला आहे. त्याही बाबतही काही मार्गदर्शक सूचना जाहीर होतील, अशी परिस्थिती आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात कोरोनाबाधितांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. तसंच कोरोनामुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या वाढल्यामुळे राज्य सरकार आणि प्रशासनासाठीदेखील चिंतेत आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील जनतेशी ऑनलाईन संवाद साधला आणि वास्तव मांडले. गेल्या काही दिवसांमध्ये लग्नसमारंभ, पार्ट्या, राजकीय मोर्चे, आंदोलने वेगात सुरू झाली. कोरोना गेला, सगळे सुरू होते. दुर्दैवाने सगळे तज्ज्ञ व्यक्त करत असलेली भीती खरी ठरली. गेल्या वेळेपेक्षाही अधिक अक्राळविक्राळ रूप धारण करून मार्चमध्ये कोरोना परतला. हा कोरोना आपली परीक्षा बघत आहे; पण या वेळी आपल्याला धैर्याने एकत्र लढण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. घरून काम करण्याचे प्रमाण वाढवण्याबाबत कार्यालयांना याआधीच सूचना दिल्या गेल्या आहेत. काही नियम आधीच लागू केले गेले आहेत. सगळ्या ट्रेन तुडुंब भरून चालल्या आहेत. रोजगार परत मिळतील; पण जीव परत मिळणार नाही, हे मुख्यमंत्र्यांचे म्हणणे खरे आहे. जगात ज्याप्रमाणे टाळेबंदीचे टप्पे जाहीर केले जातात, तसेच आताही करावे लागतील. टाळेबंदी उपाय नाही; पण संसर्गाची साखळी तोडण्याबाबत कुणीच काही बोलत नाही. लसीकरण झाल्यानंतरदेखील काही प्रमाणात कोरोनाची लागण होऊ शकते. परदेशातून आलेले तीनही स्ट्रेन महाराष्ट्रात आढळले आहेत. त्यामुळे संसर्ग थांबवण्यासाठी आणि आपली आरोग्य सुविधा वाढवण्यासाठी लॉकडाऊनचा उपयोग आहे. सध्या रुग्णवाढही झपाट्याने होत आहे. राज्यात १७ सप्टेंबर २०२० रोजी तीन लाख सक्रिय रुग्ण होते. एक एप्रिल रोजी या आकड्यातही भर पडली. तेव्हा ३१ हजार मृत्यू होते. आता ५४ हजार ९०० च्या आसपास रुग्ण झाले आहेत. तेव्हा एका दिवशी २४ हजार रुग्ण आढळले होते. एक एप्रिलला ४३ हजारांहून जास्त रुग्ण आढळले. परिस्थिती अशीच राहिली तर १५ ते २० दिवसांमध्ये आपल्याकडच्या आरोग्य सुविधा अपुऱ्या पडू लागतील. बेड वाढले, व्हेंटिलेटर्स वाढले, आयसीयूचे बेड वाढले तरी डॉक्टर, नर्सेस, आरोग्य कर्मचारी कसे वाढणार हाच खरा चिंतेचा विषय आहे. महाराष्ट्रात एकाच दिवसात तीन लाख नागरिकांचे लसीकरण केले गेले आहे. देशात एकाच दिवशी होणाऱ्या लसीकरणाचा हा सर्वाधिक आकडा ठरला. दरम्यान, अमेरिकेने लॉकडाऊनचा सातकलमी कार्यक्रम जाहीर केला. आपण लॉकडाऊन का हवं आणि का नको, या वादाच्या कात्रित अडकलो आहोत. महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री आणि मंत्री लॉकडाऊनसाठी नागरिकांनाच जबाबदार धरत आहेत. दुसरीकडे लोकांनी नियम पाळले नाहीत, तर लॉकडाऊन हाच पर्याय असल्याचे जगभरचे तज्ज्ञ सांगत आहेत. टाळेबंदी करायची नसेल तर चाचण्या, बाधितांच्या संपर्कात आलेल्यांचा पाठलाग आणि उपचार हा या त्रिसूत्रीवर भर द्यावा लागतो. तसे करण्याची हिंमत दाखवली जात नाही. अशा संकटप्रसंगी विरोधकही सरकारची कोंडी करायला निघाले आहेत. सरकारने टाळेबंदी करून जनतेला वेठीस धरू नये, अशी टीका विरोधकांकडून करण्यात येत आहे. लॉकडाऊनमुळे कोरोना रुग्णांची संख्या आटोक्यात येत नाही, लॉकडाऊन हा काही शेवटचा पर्याय नाही, असे विरोधकांचे मत आहे. महाराष्ट्राचा कारभार अगोदरच उसनवारीवर चालला आहे. विकासाला पैसा नाहीच; परंतु कोरोनाच्या उपाययोजनांसाठीही तिजोरीत काहीच नाही. अर्थव्यवस्था हळुहळू पूर्वपदावर येत असताना पुन्हा लॉकडाऊन करुन अर्थव्यवस्थेला संकटाच्या खाईत ढकलणे कुणालाही योग्य वाटत नाही; परंतु लॉकडाऊन न केल्यास कोरोनाचा मुकाबला निव्वळ अशक्य बनत चालला आहे. याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा मुकाबला करताना आपण धडा घेण्याची गरज आहे.

# भारताचे महान रत्न

**जगाच्या पातळीवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे असे नाव आहे, जे सर्वांना परिचित आहे आणि ज्या नावाने प्रत्येकावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या प्रभाव केला आहे. परंतू आता हे फक्त नाव नसून तो एक विचार, एक चळवळ आहे. म्हणूनच आंबेडकरांसारख्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे विविध पैलू प्रत्येकाने समजून घेणे गरजेचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने हा विशेष वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.**



निमित्त

**बोधी रामटेके**

जगाच्या पातळीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे असे नाव आहे जे सर्वांना परिचित आहे आणि ज्या नावाने प्रत्येकावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या प्रभाव केला आहे. परंतू आता हे फक्त नाव नसून तो एक विचार, एक चळवळ आहे, ज्याने वर्षानुवर्षे जातीय व्यवस्थेला बळी पडलेल्या भारतातील लाखों शोषित, पीडित, मागासवर्गाला माणूस म्हणून जीवन जगण्याचा अधिकार बहाल केला. आता ही चळवळ पुढे नेत असतांना बहुसंख्य लोकांचा प्रामाणिक उद्देश हा सामाजिक परिवर्तनाचा आहे , तर काहींसाठी हा फक्त मतपेटी भरण्यासाठी मर्यादित आहे (Dr. Babasaheb Ambedkar and his excellence).

डॉ.आंबेडकरांचे कार्य हे आधुनिक भारताच्या निर्मितीचे आहे. परंतू त्यांना विशिष्ट जातीपूर्तीच मर्यादित ठेवण्यात आलेले आहे. त्यांना दलित, शोषितांचे कैवारी म्हणत असतांना , ते फक्त तेवढ्यापूरतीच मर्यादित नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे. डॉ.आंबेडकरांचे योगदान हे भारतातील प्रत्येक क्षेत्रात आणि प्रत्येक समाज घटकांसाठी राहिलेलं आहे. परंतू त्यांच्या कार्यामागे एकच महत्वाचा उद्देश राहिलेला आहे. तो म्हणजे देशातील जाती व्यवस्था संपुष्टात आणणे. कारण जाती व्यवस्थाच या देशातील सर्व समस्यांची जननी आहे. आंबेडकरांसारख्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे विविध पैलू प्रत्येकाने समजून घेणे गरजेचे आहे.



समाजातील प्रत्येक घटकांना माध्यमात प्रतिनिधित्व मिळायला हवं, अन्यथा एकतर्फी आणि असंतुलित माहितीचाच प्रसार होत राहील. पण ज्या समाजाला वर्षानुवर्षे प्रतिनिधित्वा पासून वंचित ठेवण्यात आले, त्या समाजाने स्वतःचेच माध्यम तयार करावे, ज्यामुळे त्या समाजाच्या समस्या व दुःख सर्वासमोर मांडता येईल, असे डॉ.आंबेडकरांचे मत होते. म्हणून मूक्या समाजाच्या व्यथा व विद्रोह प्रकट करण्यासाठी डॉ.आंबेडकर स्वतः १९२० साली पत्रकारितेकडे वळले. ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरु केले. मूकनायक म्हणजे मुक्या समाजाचा नायक'. वर्षानुवर्षे ज्या समाजावर अन्याय होत राहिलेला आहे , त्या समाजाला त्याविरुद्ध लढा देऊन न्याय मिळवुन देण्यासाठी उपाययोजना सांगणारे एक माध्यम मूकनायक. या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी लढा निर्माण केले. कोल्हापूरचे राजे छत्रपती शाहू महाराजांनी आंबेडकरांच्या पाक्षिकाला २५०० रुपयांची मदत केली होती. तीन वर्षे हे पाक्षिक चालले त्यानंतर बाबासाहेब विदेशात गेल्यानंतर ते बंद पडले. विदेशातून परत आल्यानंतर ३ एप्रिल १९२७ साली डॉ.आंबेडकरांनी बहिष्कृत भारत' या पाक्षिकेला सुरुवात केली. तो काळ महाड सत्याग्रहाच्या आंदोलनाचा होता. या पक्षिकेत बाबासाहेबांनी अनेक महत्वाचे विषय मांडले होते. १९२७ सालीचा सर्वात मोठा चर्चेतला विषय म्हणजे एका हिंदू स्त्रीचा मुसलमान पुरुषासोबतच्या लग्नाचा. त्यावेळेस मराठी वृत्तपत्र जे प्रामुख्याने पुण्यावरून प्रकाशित होत होते , त्यांनी त्यावर टीका केली. परंतू बाबासाहेबांनी बहिष्कृत भारत' या पाक्षिकेत संपादकीय लेख लिहून त्या लग्नाचे स्वागत केले आणि आंतरजातीय- आंतरधर्मीय विवाह करण्याचे आवाहन केले होते. यातुन लक्षात येते की , सामाजिक बदल करण्याचे माध्यम म्हणून बाबासाहेब वृत्तपत्राकडे कसे बघतात. बालविवाह, वर्णाश्रमाचा प्रभाव, मंदिर प्रवेश सत्याग्रह, सत्यशोधक चळवळीचा ध्येयवाद, मजूर पक्ष, सायमन कमिशन इत्यादी विषयांवर बाबासाहेबांनी लेखन केले. १९३० साली त्यांनी जनता' नावाचे वृत्तपत्र सुरू केले. पहिल्या दोन वृत्तपत्रात म्हणजेच मूकनायक आणि बहिष्कृत भारत यात ते प्रत्यक्ष दखल घेऊन लिखाण करायचे. परंतू १९३० नंतर त्यांनी वृत्तपत्राची बरीच जबाबदारी ही त्यांच्या निकटवर्ती सहकाऱ्यांकडे सोपवली. त्यात देवराव नाईक,बी. आर कडरेकर, जी.एन सहस्त्रबुद्धे, आर.डी भंडारे आणि बी.सी कांबळे यांचा समावेश होता. १९५६ रोजी बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर डॉ.आंबेडकरांनी जनता'चे नाव बदलवून प्रबुद्ध भारत' असे केले. वृत्तपत्रांतून छापत असलेल्या जाहिरातीं विषयी आंबेडकरांचे वेगळे मत होते. जाहिरातींशिवाय वृत्तपत्रे जगू शकत नाही , हे खरे असले तरी वृत्तपत्रांनी जाहिरातीच्या आहारी जावे का? आणि कितपत जावे आर्थिक सवलतीसाठी जाहिराती आवश्यक असल्या तरी कोणत्या जाहिराती प्रकाशित कराव्यात या संबंधीची संहिता पाडायला हवी, असे ते म्हणत. जाहिरातीची उद्दीष्टे आणि जाहिरात करण्याची पद्धती यात विरोधाभास निर्माण झाला की, जाहिराती करण्यामागील तत्व भ्रष्ट होते, असा त्यांचा दावा असे. जाहिरात आणि नीतिमत्ता यांचा अनन्यसाधारण संबंध बाबासाहेबांना अपरिहार्य वाटे समाज उन्नतीचे साधन म्हणून त्यांनी वृत्तपत्रांकडे पाहिले. समाजातील दुःख, अन्याय जगासमोर मांडून त्याच्यावर उपाय सांगण्यासाठी त्यांनी वृत्तपत्राचा प्रभावीपणे वापर केला. डॉ.बाबासाहेबांनी पत्रकारितेच्या माध्यमातून मांडलेले विचार ,भूमिका आजही तंतोतंत लागू पडते. या वरूनच त्यांची दूरदृष्टी आणि विचारांची खोली दिसून येते.

भारतातील जाती व्यवस्थेच्या निर्मितीचा इतिहास डॉ.आंबेडकरांनी Caste in India: Their Mechanism, Genesis and Development, या कोलंबिया विद्यापीठात मानववंशशास्त्र विभागात सादर केलेल्या संदर्भात उत्तमरित्या मांडला . ज्याला आज पर्यंत कुणी आव्हान देऊ शकले नाही,

त्या वर्ण,जातीच्या आधारावर टिकून असलेल्या व्यवस्थेने माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार हिरावून घेतला होता आणि तो अधिकार २१ व्या शतकात सुद्धा हिरावला जात आहे. या अश्या जात व्यवस्थेच्या रूढी, परंपरेला संपुष्टात आणण्याचं काम डॉ. आंबेडकरांनी केलेलं आहे आणि या विरोधात लढा देण्याच्या कामाला डॉ.आंबेडकरांनी या माध्यमातून सुरुवात केली होती. हजारो वर्षापासून चालत आलेली जाती व्यवस्था मनुने मनुस्मृती या ग्रंथात नियमावलीच्या रुपात तयार केली , ज्यात वर्णाधारीत नियम होते. विषमता प्रस्थापित करणारा तो ग्रंथ होता. ज्याने स्त्रीचा सन्मान केला नाही. अश्या मनुस्मृतीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी दहन करून, या व्यववस्थेला मोठे आव्हान देण्याचे काम केले.

त्यापूर्वी २० मार्च १९२७ ला जगाच्या पातळीवर पाण्यासाठी पाहिला सत्याग्रह केला होता. ऑगस्ट १९२३ मध्ये मुंबई कायदे मंडळाने एक निर्णय पारित केला, त्यानुसार सार्वजनिक खर्चाने बांधलेल्या आणि देखरेख होत असलेल्या किंवा सरकारने नेमलेल्या मंडळांकडून निर्माण केलेल्या सर्व सार्वजनिक पाण्याच्या जागा, विहिरी, धर्मशाळा, सार्वजनिक शाळा, न्यायालये, कचेऱ्या व दवाखाने यांवर सर्वांना म्हणजेच अस्पृश्यांना परवानगी असावी असे म्हटले गेले. महाडच्या नगरपालिकेनेही जानेवारी १९२४ साली ह्या कायद्याची अंमलबजावणी करणारा निर्णय पारित केला . परंतू त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालीच नाही. अखेर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून दि. १९ व २० मार्च १९२७ रोजी महाड येथे सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. आणि ज्या अस्पृश्य समाजाला गावातील सामूहिक पाण्याच्या स्त्रोतातून पाणी पिण्याचा अधिकार नव्हता तो पाण्याच्या स्त्रोत डॉ. आंबेडकरांनी सर्वासाठी खुला केला. परंतू तो सत्याग्रह फक्त पाण्यासाठी नसून मानवाधिकारासाठीचा सत्याग्रह होता , हे सुद्धा लक्षात घेणे गरजेचे आहे. पाण्याचे स्त्रोत खुले करून अस्पृश्यता निवारण होणार नाही, हे त्यांना माहीत होते . परंतू बाबासाहेबांचा हा प्रयत्न होता की , या माध्यमातून अस्पृश्यांना आपल्या उद्धारासाठी संघटितपणे लढण्याची प्रेरणा मिळेल.

महत्वाचे म्हणजे महाड सत्याग्रहाच्या आधी बाबासाहेब रायगडावर जाऊन शिवरायांना मानवंदना दिली होती आणि सत्याग्रहाच्या वेळेस जय शिवरायाच्या' घोषणा सुद्धा दिल्या होत्या. त्यानंतर २ मार्च



१९३० साली बाबासाहेबांनी प्रसिद्ध काळाराम मंदिराचा सत्याग्रह केला. २९ डिसेंबर १९२९ रोजी विहितगावच्या चावडीत झालेल्या बैठकीत मंदिर प्रवेशाची घोषणा केली आणि सत्याग्रहाची तारीख निश्चित करण्यात आली. या संदर्भातील माहिती जिल्हाधिकारी आर.जी गार्डन यांना देण्यात आली . त्यानंतर त्यांनी महाविभागाचे आयुक्त यांना कळविले. सत्याग्रहात सुमारे आठ हजार लोक एकत्र झाले होते. त्यांनी मंदिराच्या चारही दरवाज्यांवर ठिय्या दिला होते. सत्याग्रहाच्या दरम्यान सनातन्यांकडून दगड फेक करण्यात आली होती त्यात बाबासाहेबांसह अनेक सत्याग्रही जखमी झाले होते. परंतू एकही सत्याग्रही मागे हटला नाही. शेवटी सरकारला सत्याग्रहापुढे झुकावेच लागले. डॉ.आंबेडकर म्हणतात की, काळाराम मंदिराचे सत्याग्रह करून आम्हाला राम भक्त बनायचे नाही, तर या भारत देशात असणाऱ्या दगडी जातीव्यवस्थेला सांगायचे आहे की , आम्ही पण सजीव प्राणी आहोत. तुमच्या या मंदिरात कुत्रे, मांजरे, शेळ्या, मेंढ्या प्रवेश करू शकतात तर आम्ही का नाही?? यातून हेच दिसून येते की , ही लढाई देवळात जाऊन देवाला पूजण्याची नाही तर अस्मितेची व स्वाभिमानाची लढाई होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक मंदिरांच्या प्रवेशासाठी सत्याग्रह केला. त्यात, अंबादेवी मंदिराचा सुद्धा समावेश होता. अमरावती येथील प्राचीन अंबादेवी मंदिरात अस्पृश्य हिंदूंना प्रवेश मिळावा, यासाठी देशाचे पहिले कृषिमंत्री डॉ.पंजाबराव देशमुख यांनी पुढाकार घेतला होता. त्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना १३ नोव्हेंबर १९२७ रोजी परिषदेसाठी बोलावण्यात आले होते. तारीख निश्चित करून यशस्वीरित्या तो सत्याग्रह पार पडला. पुण्यातील सुद्धा काही मंदिरांच्या प्रवेशासाठी डॉ.आंबेडकरांनी सत्याग्रह केला . त्यात पर्वती टेकडीवरील मंदिराचा सुद्धा समावेश होता. महाराष्ट्रातील अनेक मंदिर अस्पृशांसाठी सुरू करून त्यांच्या अस्मितेच्या आणि स्वाभिमानाच्या लढाईत डॉ. आंबेडकर यशस्वी झाले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीदास्याची समस्या मांडतांना ज्योतिबा फुलेंची भूमिका स्वीकारली होती. अस्पृश्यता आणि जातीव्यवस्थेची समस्या समजून घेण्यासाठी मनुस्मृती सकट सर्व धर्मग्रंथांची चिकित्सा केली व रामायण, महाभारत आणि सर्व हिंदू पुरणाचा मानवीयतेच्या दृष्टीने अभ्यास केला . यातून ते एकच निष्कर्ष काढतात की, वर्णव्यवस्था, जातीवाद आणि अस्पृश्यतेचे मूळ हे याच धर्मग्रंथात दडलेलं आहे. सोबतच स्त्री गुलामगिरीच्या प्रथा (सतीप्रथा,बालविवाह,विधवा पुनर्विवाहास बंदी) या कश्या जातिव्यवस्थेशी जुडलेल्या आहेत, हे सुद्धा त्यांनी स्पष्ट केले. माणसा-माणसात आणि स्त्री-पुरुषांमध्ये विषमता प्रस्थापित करण्याचं काम व विषमतावादी ,कर्मकांडी विचारांचा प्रसार हे मनुस्मृती सारखे धार्मिक ग्रंथ करीत आहेत . म्हणून २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृती जाळून स्त्री मुक्तीच्या लढ्याला सुरुवात केली.

ज्या मनुस्मृतीने स्त्रियांचे सर्व प्रकारचे हक्क नाकारले होते,जी पुरुषप्रधान व्यवस्थेची गुलाम झाली होती, जीला कौटुंबिक, सामाजिक सन्मान नव्हता आणि कोणत्याही प्रकारचा आर्थिक अधिकार नव्हता. तिला या सगळ्या अन्यायातून बाहेर काढण्यासाठी बाबासाहेबांनी भारताचे कायदेमंत्री असतांना २१ सप्टेंबर १९५१ रोजी त्यांना न्यायिक हक्क,दर्जा व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी हिंदू कोड बिल' मांडले. पण भारतातील सनातनी आणि पुरुषप्रधान व्यवस्थेने बाबासाहेबांचा विरोध केला व ते बिल मंजूर झाले नाही आणि फक्त स्त्री मुक्तीच्या लढ्याच्या अपयशाने दुखी होऊन त्यांनी भारतातील तमाम स्त्रियांच्या हक्कांसाठी २७ सप्टेंबर १९५१ रोजी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. प्रारंभी या बिलाचे ७ भाग होते १. स्त्रियांना मालमतेचा वडिलोपार्जित अधिकार २.मृताचा वारसदार ठरविण्याचा अधिकार ३. पोटगी ४. विवाह ५. घटस्फोट ६. दत्तकविधान ७. अज्ञानत्व व पालकत्व जे मंजूर काण्यात आले नाहीत. पुढे १९५५ रोजी हिंदू कोड बिल वेगळ्या स्वरूपात मंजूर झाले . त्यात १. हिंदु वारसाहक्क कायदा २. हिंदू विवाह कायदा ३. हिंदू अज्ञांचे पालकत्व कायदा ४. हिंदू दत्तक व पोटगी कायदा यांचा समावेश होता. अंतशः का होईना पण बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण झाले आणि आज स्त्री एक व्यक्ती म्हणून स्वाभिमानाने जगण्यास पुढे येऊ लागली.

बाबासाहेबांचे हे कार्य फक्त स्त्रीमुक्तीच्या संदर्भातच नव्हे तर संपूर्ण मानवजातीच्या दृष्टीने ऐतिहासिक आहे.

भारतातील शेतकरी व शेती पूरक व्यवसाय करणाऱ्या लोकांसाठी डॉ.आंबेडकरांचे फार मोठे योगदान राहिलेले आहे. डॉ.आंबेडकरांनी कोकणातील शेतकऱ्यांचे खोतांच्या दास्यातून मुक्तता व्हावी , म्हणून फार मोठी चळवळ उभारली. १७ सप्टेंबर १९३७ रोजी खोती पद्धत नष्ट करणाऱ्या कायद्याचे विधेयक बाबासाहेबांनी मुंबई विधी मंडळात मांडले होते. १० जानेवारी १९३८ रोजी २३ हजार शेतकऱ्यांचा मोर्चा डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली विधी मंडळावर नेण्यात आला होता . त्यात कोकण, सातारा, नाशिक व विविध भागातील शेतकरी सामील झाले होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडन्यासाठी अनेक सभांमध्ये मार्गदर्शन करून सर्व जाती धर्माच्या शेतकऱ्यांसाठी चळवळ उभी केली.१४ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी येतील चिपळूण येथे पार पडलेल्या शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद बाबासाहेबांनी भूषवले. महार वतनदारी निर्मूलनासंदर्भात परंपरागत सेवा कायद्या नुसार निम्नस्तरीय शासकीय कर्मचारी २४ तास राबविल्या जात होते , त्यांना हा निर्घृण अन्याय सहन करण्याचा मोबदला लहानसा पिकाऊ नसलेला जमिनीच्या तुकड्याच्या रूपात दिला जाणार होता. या संदर्भात गरीब ग्रामीण व जनतेला त्यांनी न्याय मिळवून दिला व त्यांना जागरूक केले. आंबेडकरांनी शेती विषयक आखलेल्या योजनांपैकी एक महत्वाची योजना म्हणजे, दामोदर प्रकल्प. त्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी, वीजनिर्मितीसाठी व पाण्यातील दळणवळणासाठी करावा , असे त्यांना वाटले. त्यांनी दामोदर नदी प्राधिकरण स्थापन करून सोन नदी, महानदी, कोसी, चंबळ आणि दक्खनमधील नद्यांचे काम हाती घेतले.सामूहिक शेतीवर त्यांचा भर होता. शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती न करता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करावी आणि ती सुद्धा सामूहिक असावी असे त्यांचे मत होते. भारताचा शेती हा मुख्य व्यवसाय असला तरी भारतीय लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून न राहता शेतीपूरक इतर धंद्याकडे वळावे , असे त्यांना वाटत होते. शासनातर्फे निगराणी, कर्जरोखे, पैश्यांची परतफेड या सोबतच शेती व महत्वाचे उद्योग राष्ट्राच्या मालकीचे व्हावेत ,असे त्यांचे मत होते. बाबासाहेबांनी शेती विषयक केलेल्या कामांपैकी महत्वाचे काम म्हणजे राष्ट्रीय सिंचन धोरण. हे धोरण त्यांनी सरकारला सुचविले होते. पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आहे आणि पाण्यामुळेच देश जगू शकतो हे त्यांनी सांगितले होते. बाबासाहेबांच्या विचारानुसारच सरकारने दामोदर प्रकल्प, हिराकुंड प्रकल्प व इत्यादी अनेक प्रकल्प हाती घेतले होते. व्यक्ती ते राष्ट्र असा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशावर आधारित योजना त्यांनी आखल्या होत्या. शेती व शेतकऱ्यांच्या अधिकारावर गदा येऊ नये , म्हणून शेतकरी व मजुरांनी संगठीत होणे आवश्यक असल्याचे बाबासाहेबांनी वेळो वेळी सांगितले होते. दूरदृष्टी ठेऊन काम करणाऱ्या आंबेडकरांनी देशातील प्रत्येक भारतीयांच्या कल्याणासाठी कार्य केलेले आहे . सोबतच समता, बंधुता आणि न्यायावर एकसंघ राष्ट्र निर्माणसाठी त्यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून खूप मोठे योगदान दिले आहे.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 'महा रक्तदान शिबिर'

## रक्तदान शिबिरात उत्स्फुर्त सहभागी व्हावे; पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे आवाहन



▶ प्रतिनिधी

बीड : महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बीड येथील सामाजिक न्याय भवन येथे येत्या १५ एप्रिल रोजी 'महा रक्तदान शिबिर' आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमात समाज कल्याण विभागाच्या सर्व अधिकारी कर्मचारी तसेच सामाजिक कार्यकर्ते व तरुणांनी सहभागी होऊन मोठ्या संख्येने रक्तदान करावे, असे आवाहन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

कोरोनाच्या उद्रेकामुळे राज्यात सर्वत्र बाधित रुग्णांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. राज्यात सर्वत्र रक्ताचा तुटवडा असून, विविध पक्ष, सामाजिक संघटनांना राज्य सरकारने रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन केलेले आहे. १४ एप्रिल रोजी जगभरात महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली जात आहे. कोरोना व त्यामुळे सुरू असलेले निर्बंध पाहता जयंती उत्सव सार्वजनिकरित्या साजरा होणार नाही. मात्र, बीड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे यानिमित्ताने सर्व शासकीय नियमांचे पालन करून महा रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यात शासकीय व खासगी रक्तपेढ्यांमध्ये सध्या रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा भासत असून, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्र व समाज हिताची जी शिकवण समाजाला दिली, त्याचे अनुपालन करण्याचा हा एक मार्ग असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. दरम्यान, बीड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे दि.१५ एप्रिल रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत हे महा रक्तदान शिबिर होणार असल्याची माहिती समाज कल्याण सहाय्यक आयुक्त डॉ.सचिन मडावी यांनी दिली आहे.



# ढोरगावच्या सरपंच यमुना सरवदे अपात्र

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील ढोरगाव येथील सरपंच यमुना ग्यानबा सरवदे यांना ग्रामपंचायत सदस्यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन अप्पर विभागीय आयुक्त बाबासाहेब बेलदार यांनी अपात्र ठरवले आहे. गावात राबविण्यात आलेल्या विविध शासकीय योजनेत काम न करता गैरव्यवहार करून अपहार आणि नियमित मासिक सभा २०१८-१९ मध्ये घेतल्या नसल्याची तक्रार ग्रामपंचायत सदस्यांनी केली होती.

तालुक्यातील ढोरगाव येथे गावच्या ग्रामपंचायत सहा सदस्यांनी दि.१८ जानेवारी २०१९ रोजी गावातील सरपंच यमुना ग्यानबा सरवदे व ग्रामसेवक यांनी मिळून विविध कामात गैरवापर केल्याची तक्रार गटविकास अधिकारी यांच्याकडे दाखल केली होती. यामध्ये गट विकास अधिकारी यांनी चौकशी केली असता त्यामध्ये गावातील समाज मंदिरासमोरील पेवर ब्लॉक काम पूर्ण न करता ३३ हजार रुपये उचलले, जिल्हा परिषद शाळेजवळील नालिकाम अर्धवट ठेवून ४३ हजार पाचशे रुपये उचलले, शाळेतील टीव्ही संचबद्दल २२ हजार पाचशे रुपये उचलले, शाळेतील टीव्ही संचबद्दल २२ हजार सहाशे रुपये उचलले, पाणी फिल्टर नादुरूस्त प्रकरणी १९ हजार व २३ हजार रुपये उचलले परंतु ही कामे केली नाही,

तसेच दलित वस्ती सुधार योजनेत निकृष्ट सौर पथदिवे बसवले यासह विविध तक्रारीची चौकशी केली असता त्यात सत्यता आढळून आली व त्याप्रमाणे आपला अहवाल जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ३१ जुलै २०२० रोजी ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९-१ नुसार कार्यवाहीस सरपंच पात्र असल्याचा अहवाल आयुक्तांना सादर केला.

याबाबत ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले. तसेच त्यांची एक वर्षाची वेतनवाढ कायमस्वरूपी रोखण्यात आली. यानंतर विभागीय आयुक्तांकडे सुनावणी घेण्यात आली. याप्रकरणी ग्रामपंचायत सदस्य सुखदेव अर्जुन मुळे, यशवंत मारुती सातपुते, छगन दौलत सरवदे, दत्ता प्रकाश आबूज, शोभा भारत सातपुते, सुनिता छगन सरवदे या सदस्यांनी ही तक्रार दाखल केली होती.

## राजेंद्र होके पाटील यांना मातृशोक

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शेतकरी नेते तथा मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक राजेंद्र होके पाटील यांच्या मातोश्री विमल अच्युतराव होके यांचे अल्पशा आजाराने शनिवार दि.१० रोजी रात्री नऊच्या दरम्यान निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ६८ वर्षे होते. पहाटे दोन वाजण्याच्या दरम्यान सिंदफणा स्मशानभूमीत त्यांच्यावर अंतिमसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच मुली, नातवंडे असा परिवार आहे. होके पाटील यांच्या परीवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.



## छायाचित्रकार विश्वेश्वर शेटे याचे निधन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील समर्थ फोटो स्टुडिओचे संचालक तथा लोकप्रिय छायाचित्रकार विश्वेश्वर ऊर्फ ईशू सुधाकरअप्पा शेटे याचे वयाच्या अवघ्या २७व्या वर्षी दि.१० एप्रिल शनिवार रोजी सायंकाळी निधन झाले. शनिवारी रात्री उशिरा त्यांच्या पार्थिवावर माजलगाव शहरातील वीरशैव लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. ईशू शेटे याच्या दोन्ही किडण्या निकामी झाल्यामुळे मागील एक वर्षापासून त्यांच्यावर औरंगाबाद येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. शनिवारी सायंकाळी सहा वाजता त्याची प्राणज्योत मालवली. विश्वेश्वर शेटे याच्या पश्चात आई श्रीमती शारदा शेटे, मोठा भाऊ शरद शेटे असा परिवार आहे. शेटे यांच्या परीवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.



## युवा उद्योजकाचा सत्कार



धारूर : तालुक्यातील चाटगाव येथील युवा उद्योजक सुदाम वसंत केकान यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना धनराज मुंडे, अमरसिंह मस्के पाटील, कुणाल मुंडे आणि मित्र परिवार.

# विद्यार्थीप्रिय शिक्षकाची एक्झिट मंजुळदास गवते यांचे निधन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शिक्षक उपमुख्याध्यापक ते मुख्याध्यापक या जबाबदारीच्या पदाने श्री सिद्धेश्वर विद्यालयात विद्यार्थीप्रिय ठरलेले सेवानिवृत्त मुख्याध्यापक मंजुळदास गवते यांचे गुरुवार दि.८ रोजी सकाळी ९ वाजता हृदयविकाराचा तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ५८ वर्षे होते. मागच्या १२ दिवसांपासून ते औरंगाबाद येथील मेडीकव्हर रुग्णालयात कोरोना वर उपचार घेत होते.



चार दिवसांपासून त्यांची प्रकृती उत्तम सुधारत होती. या आजारावर मात करत असताना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांचा मृत्यू झाला. तालुक्यातील गोविंदपुर गावचे रहिवासी असलेले मंजुळदास गवते श्री सिद्धेश्वर विद्यालयाचे माजी शिस्तप्रिय विद्यार्थी होते. पुढे याच काळात ते शिक्षक म्हणून कार्यरत झाले. गणित विषयातील हातखंडासह विद्यार्थ्यात, सहकारी शिक्षकात, व्यवस्थापनात, एक मनमिळावू शिक्षक उपमुख्याध्यापक म्हणून ते परिचित होते. २०१५ ते २०१९ काळात त्यांनी शाळेचे मुख्याध्यापक म्हणून काम पाहिले. दरम्यान, शाळेने गुणवत्ता, क्रीडा, संस्कृतिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली. मागच्या वर्षी अंबाजोगाई येथील खोलेश्वर विद्यालयात त्यांची बदली झाली होती. या शाळेतही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला होता. महिनाभरापूर्वी ते सेवानिवृत्त झाले होते. यावेळी जंगी सन्मान त्यांचा शाळेकडून करण्यात आला होता. तालुका परिसरात मनमिळावू, मितभाषी म्हणून ते परिचित होते. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केला जात आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले एक मुलगी असा परिवार आहे. गवते यांच्या परीवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

# कोरोनाशी चार हात करताना उपाययोजना



देशात कोरोनाची दुसरी लाट सुरू झाली असून रोजच लाखांहून अधिक रुग्ण सापडत आहेत. तसेच मृतांचा आकडाही वाढताना दिसत आहे. अनेक राज्यातील परिस्थिती चिंताजनक असून कडक निर्बंधही लादण्यात येत आहे.

कोरोनाची दुसरी लाट अधिकच जीवघेणी होत असून रुप बदलणाऱ्या स्ट्रेनमुळे वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांनी लोकांना सावध राहण्याचा इशारा दिला आहे. कोरोनाची लस घेतल्यानंतरही अनेकांना याची लागण होत आहे. त्यामुळे काही गोष्टींचे कटाक्षाने पालन करण्याची गरज आहे. १) तुम्ही जर बाहेरून जेवण मागवणार असाल तर सावध रहा. शक्यतो ऑनलाईन पेमेंट करा आणि रोखीचे व्यवहार कमी ठेवा. तसेच ऑर्डर स्वीकारण्यापूर्वी हातात ग्लोअज घाला.

२) बाहेरून आल्यानंतर किंवा बाहेरून एखादी वस्तू आणल्यानंतर हात सॅनिटाईज करा. हात साबणाने स्वच्छ धुवा.३) कोरोनाचे लक्षण दिसल्यानंतर घरातील सदस्यांच्या संपर्कात येऊ नका. स्वत:चे कपडे आणि भांडी देखील घरातील सदस्यांच्या संपर्कात येणार नाही असे ठेवा.४) वन टाईम यूज अर्थात एकदा वापरून फेकून देता येईल असा मास्क वापरत असाल तर तो कुठेही फेकू नका. त्यामुळे रोगराई पसरू शकते. त्याची योग्य विल्हेवाट लावा. ५) घरातील एखाद्या सदस्याला कोरोनाची लागण झाली असेल तर लहान मुलं, वृद्ध आणि गर्भवती महिलांना त्यापासून जास्त धोका असल्याने त्यास त्यांच्या संपर्कात येऊ देऊ नका.६) कोरोना रुग्णाच्या प्रातर्विधी, अंघोळ आणि जेवणाची स्वतंत्र व्यवस्था करा.घरातील आणि बाहेरच्या व्यक्तीला त्याच्या संपर्कात येई देऊ नका. त्या व्यक्तीने वापरलेल्या गोष्टी सॅनिटाईज करा. त्या व्यक्तीसह घरातील सदस्यांनाही मास्क वापरण्यास सांगा.७) कोरोनाची लक्षणे दिसल्यास तात्काळ सरकारी हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधा किंवा जवळच्या रुग्णालयात धाव घ्या.८) मित्र, नातेवाईक यांना भेटण्याऐवजी सध्यातरी सोशल मीडियाचाच आधार घ्या. तसेच भेट घेतली तरी सुरक्षित अंतर राखा आणि मास्कचा वापर करा. तसेच हात मिळवणे,आलिंगन देणे टाळा.९) बाहेरून आल्यावर फोन, हेडफोन, घराची, गाडीची चावी यासारख्या गोष्टीही सॅनिटाईज करा. लिफ्टमध्ये बटणांना हात लावण्यापूर्वी ग्लोअज वापरा किंवा चावीचा वापर करा किंवा पायांचा वापर करा.१०) किराणा सामान, भाजीपाला आणल्यानंतर सॅनिटाईज करून घ्या. फळं मिठाच्या पाण्याने धुवून नंतर स्वच्छ पाण्याने धुवा आणि मगच सेवन करा.

# रेमडेसिविर इंजेक्शनाअभावी रूग्णांचे हाल

## जिल्हा आरोग्य प्रशासनाची हतबलता; गंभीर रुग्णांवर उपचारात अडचणी

▶ प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यात सध्या रेमडेसिविर इंजेक्शनचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे. कोरोनाबाधितांसह संशयितांना हे इंजेक्शन उपलब्ध करून देण्यासाठी नातेवाइकांना धावपळ करावी लागत आहे. तर औषधी उपलब्ध करून देण्यास जिल्हा प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरत असल्याचे स्पष्ट होत आहे. यात सामान्य रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. औषधी उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

मागील महिनाभरापासून जिल्ह्यात कोरोनाबाधित रूग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. तर दुसऱ्या बाजूला औषधी अपुऱ्या पडताना दिसत आहेत. यत रेमडेसिविर इंजेक्शनचा जास्त तुटवडा जाणवत आहे. बाधित आणि संशयित रुग्णांना हे इंजेक्शन जास्त लाभदायक ठरत असल्याचे सांगितले जात असल्याने मागणीही वाढली आहे. मागील आठवड्यापासून तर हे इंजेक्शन मिळविण्यासाठी खूपच धावपळ करावी लागत आहे. असे असतानाही ते मिळत नाही. रविवारी तर जिल्ह्यात इंजेक्शनच उपलब्ध नव्हते. औषध प्रशासनाकडे मागणी केल्यावर सोमवारचा मुहूर्त सांगण्यात येत होता. यात सामान्य रुग्णांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. जिल्हा प्रशासन मात्र तुटवडा आहे, असे सांगून हात झटकत असल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे.



### 'तक्रारी असतील तर थेट संपर्क साधा'

रेमडेसिविर इंजेक्शन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही औषध प्रशासनाची आहे. येथील औषध निरीक्षक रामेश्वर डोईफोडे यांनी ७८७५९०८१०५ हा क्रमांकावर ज्यांना रेमडेसिविर अथवा इतर औषधांसंदर्भात तक्रार असेल त्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# योगीराज श्री स्वामी समर्थ



भक्तवत्सल, भक्ताभिमानी अक्कलकोट निवासी राजाधिराज योगीराज परब्रह्म भगवान श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या जयंतीनिमित्त विशेष लेख.

**विशेष**

**शिवशंकर भंडारे**

गुरु, सदगुरू, परमगुरु, परात्पर गुरु आणि गुरुतत्व हे सर्व भगवान दत्त स्वरूप आहेत. असे संत परंपरेतील संत ज्ञानेश्वर माऊली पासून ते जगद्गुरु संत तुकाराम महाराजापर्यंत सर्व संतांनी सांगितले आहे. परब्रह्म भगवान दत्त स्वरूप श्री स्वामी समर्थ महाराज यांनी चैत्र शुद्ध २ शके १६७८ साली कर्दळीवनातून अयौनी अविष्कार धारण केला. संपूर्ण विश्वाचे गुरुपद स्विकारुन विश्वाला अध्यात्मिक मार्गदर्शन, भांबावलेल्या जणांना मन:शांती प्रदान करण्याचे कार्य केले. संपूर्ण भारतभ्रमण करुन सर्वसामान्य जणांना अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा, नास्तिक मतवादी यांनी घातलेल्या थैमानातून मुक्त करुन अधिदैविक-अधिभौतिक-अध्यात्मिक याविषयी सर्वसामान्यांना समजेल अशा प्रकारे मार्गदर्शन केले तसेच उपासना, डोळस श्रध्दा, व्रत यांचे महत्त्व व परिणाम ज्ञात केले. श्रध्दा, अश्रद्धा, अंधश्रद्धा, डोळस श्रध्दा यातील भेद आपल्या आचरणातून दाखवून दिले. फक्त दैववादी न राहता प्रयत्न वादाला दैववादाची जोड अर्थात (दवा आणि दुवा) हे तत्त्व अंगिकारले तर सहजसाध्य यश पदरी पडते. सबसे बड़ा गुरु। गुरु से बड़ा गुरु का ध्यास। या उक्ती प्रमाणे दु:खितांचे मन:शांती देवून जीवन सुखी केले. सत प्रवृत्ती समाजात रुजवून धर्म रक्षणाचे कार्य श्री स्वामी समर्थ महाराज यांनी अक्कलकोट येथे राहून केले. श्री स्वामी समर्थ महाराज यांनी संपूर्ण भारतभ्रमण करुन आपली कर्मभूमी अक्कलकोट ही निवडली अक्कलकोट मध्ये महाराजांनी २५ वर्षे वास्तव्य करून अनेक अदभूत लीला- साक्षात्कार करुन 'अशक्य ही शक्य करतील स्वामी' हे ब्रीद निर्माण केले. प्रचंड अज्ञान व कौटुंबिक-प्रापंचिक समस्यांनी, कर्जबाजारी पणामुळे सावकारांच्या भितीने व्याकूळ झालेल्या असंख्य जणांना 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे. हे आत्मविश्वास निर्माण करणारे आशिर्वचन दिले व प्रत्यक्ष तशी प्रचीती पण दिल्या होत्या व आजही ते कार्य त्याच गतीने नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथून श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या माध्यमातून परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या देहातून श्री स्वामी समर्थ महाराज हजारो केंद्रांच्या माध्यमातून करत आहेत. श्री स्वामी समर्थ महाराजांची सेवा ग्राम अभियानातील १८ विभागातून खेड्यापाड्यात- गावागावात- वाडी वस्तीत तसेच घराघरात पोहचवण्याचे काम केले जाते. आज श्री स्वामी समर्थ सेवा, अध्यात्मिक विकास केंद्र महाराष्ट्र-भारत देशासह आंतरराष्ट्रीय स्तरावर एकुण १४ देशात मिळून ८ हजार केंद्रातून कोट्यवधी भाविक सेवेकरी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या सेवेतून अनुभूती घेत आहेत. ब्रम्हांडापासून तृणवत जीवापर्यंत गुरु तत्व आहे. हे सांगताना संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात

'सदगुरू असता पाठीराखा। इतरांचा लेखा कोण करी। राजयांची कांता काय भिक मागे। ममाचिया जोगे सिध्दी पावे। ज्ञानदेव म्हणे आता तरलो तरलो। आता उध्दरलो सदगुरूकृपे।'

या प्रमाणे मानवी मनाची मशागत गुरुच्या उपदेशातून होते. अन्यथा वाटसरू वाट चुकल्याप्रमाणे जीवन भरकटून दुरावस्था होते. अशा गुरुची जीवनात अवश्यकता असते. प्रभू रामचंद्र, प्रभू श्री कृष्ण यांनाही अनुक्रमे विश्वामित्र व सांदिपणी यांच्या आश्रमात जाऊन १४ विद्या व ६४ कलांचे ज्ञान आत्मसात करून पुढील जीवन व्यतीत करावे लागले. आज समाजात बरेच स्वयंघोषित गुरु आहेत, परंतु गुरु कसा असावा याची माहिती श्री स्वामीचरित्रसारामृत मध्ये दिलेली आहे.

जो अज्ञान तिमिर नाशक। अविद्या काननछेदक। जो सद बुध्दीचा प्रकाशक। विद्या दायक गुरुवर्य। ज्यांचीया कृपेकरुन सशिष्या लाभे दिव्य ज्ञान। तेणेचि जगी मानवपण येतसे की निश्चये।

ध्यान मुलं गुरुर्मूर्ती, मंत्र मुलं गुरुर्वाक्यं।
पूजा मुलं गुरुपाद्यं, मोक्ष मुलं गुरुर्कृपा।।

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पावन चरणी कोटी कोटी प्रणाम..!

# गांभीर्याने काम करा; पुढील पंधरा दिवस अत्यंत महत्त्वाचे

## पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या सुचना; उपाययोजनांचा घेतला आढावा

▶ प्रतिनिधी

बीड : कोरोनाचा वाढलेला प्रभाव लक्षात घेत प्रशासनातील प्रत्येक घटकाने गांभीर्यपूर्वक काम करावे, कोरोनाविरूद्धची ही लढाई निकराची असून, पुढील १५ दिवस अत्यंत महत्वाचे व निर्वानीचे आहेत. जिल्ह्यात कुठेही बेड, ऑक्सिजन, व्हेंटिलेटर्स, रेमडीसीविर किंवा अन्य कोणत्याही बाबींची कमतरता भासणार नाही, यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे मत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले.





पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्ह्यातील कोविड परिस्थिती व त्यावरील उपाययोजना यासंदर्भात जिल्ह्यातील सर्व प्रमुख लोकप्रतिनिधी व सर्व विभागाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत कोविड आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली, त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत धनंजय मुंडे बोलत होते. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून बीड जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे, मृत्युदर देखील वाढला असून, योग्य उपचार, बेडची उपलब्धता यासह ऑक्सिजन, रेमडीसीविर इंजेक्शनची वेळेवर व रास्त भावात उपलब्धी या सर्वच बाबींवर मंत्री धनंजय मुंडेंनी अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

बीड जिल्ह्याला ऑक्सिजनच्या बाबतीत पुन्हा एकदा आत्मनिर्भर बनवू, जिल्ह्यात कुठेही एक लिटर ऑक्सिजन देखील कमी पडणार नाही, अशी खात्री यावेळी मुंडेंनी दिली. तर दुसरीकडे रेमडीसीविर या इंजेक्शनचा तुटवडा भासत असून, साठेबाजी व काळाबाजार करण्याचे प्रकार उघडकीस येत आहेत, याबाबत प्रभावी यंत्रणा राबवून दैनंदिन तत्वावर नियंत्रण समिती स्थापन करावी, ज्यांना आवश्यक त्यांनाच इंजेक्शन व तेही रुग्णालयामार्फत ही प्रणाली तातडीने विकसित करावी. जिल्ह्यात आलेले इंजेक्शन व वितरण याचे दररोज ऑडिट या यंत्रणेमार्फत केले जावे, असे निर्देश धनंजय मुंडे यांनी संबंधितांना दिले आहेत. रुग्णांच्या व्यवस्थापणापासून ते इतर सर्वच बाबींमध्ये प्रशासकीय व्यक्तीकडून हलगर्जीपणा झाल्याचे उघड झाल्यास त्यावर कार्यवाही करू, कोणीही व्यक्ती किंवा समूह रुग्णसंख्या वाढीस कारणीभूत ठरत असेल तर त्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनास पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत.

# आमदार प्रकाश सोळंके कोरोना पॉझिटिव्ह

## प्रकृती स्थिर; पुण्याच्या केईएममध्ये उपचार सुरू

▶ प्रतिनिधी

माजलगाव : आमदार प्रकाश सोळंके यांना कोरोनाची लागण झाली आहे. गुरुवारी मध्यरात्री त्यांना पुण्याच्या केईएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे निकटवर्तीयांकडून सांगण्यात येत आहे.



माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांना गेल्या काही दिवसांपासून कोरोनाची लक्षणे जाणवू लागली त्यांनी तपासणी केली असता कोरोनाची लागण झाल्याचे स्पष्ट झाले. गुरुवारी मध्यरात्री त्यांना पुण्याच्या केईएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले, प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, त्यांनी मतदारसंघातील जनतेला आवाहन केले आहे. आपली आणि आपल्या कुटूंबाची काळजी घ्या, आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडा असा संदेश त्यांनी दिला आहे. गेल्या आठवड्यात मुंबईत मंत्रालयात मतदारसंघातील विविध विकास कामांसंदर्भात मंत्र्यांसोबत बैठकीत त्यांनी हजेरी लावली होती.

# महात्मा फुले जयंतीदिनी शेकापचे 'आसूड आंदोलन'

▶ प्रतिनिधी

माजलगाव : क्रांतिसुर्य महात्मा फुले यांच्या जयंतीदिनी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने रविवार दि.११ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता आसूड आंदोलन करून सरकारचा जोरदार निषेध व्यक्त केला.

शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने बाजार समितीने शेतकऱ्यांचे भाजीपाल्यासह फळांचे बीट सुरू करुन खरेदी करण्याच्या मागणीसाठी प्रशासनाने आंदोलनाला परवानगी नाकरल्याने मोठेवाडी येथील लिंबोनीच्या बागेत क्रांतिसुर्य महात्मा फुले यांची जयंती साजरी करून महात्मा फुले यांच्या प्रतिमेच्या साक्षीने शासनाच्या निषेधार्थ भाजीपाला व फळे फेकून दिला. सरकारच्या प्रतिकात्मक पुतळ्याला आसुडाचे फटके देत आसूड आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांच्या फळे व भाजीपाला बाजार समितीने बीट सुरू करुन खरेदी करण्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाच्या वतिने रविवार दि.११ एप्रिल रोजी बाजार समिती व तहसील प्रशासनाला निवेदनाद्वारे दिला होता, परंतु कोरोनाच्या धर्तीवर पोलीस प्रशासनाने कलम १४९ प्रमाणे नोटीस देऊन आसूड आंदोलनाला परवानगी नाकरल्याने शेकापच्या वतीने मोठेवाडी येथील लिंबोनीच्या शेतात दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास क्रांतिसुर्य महात्मा फुले यांची जयंती साजरी करून, महात्मा फुले यांच्या प्रतिमेच्या साक्षीने प्रंचड घोषणाबाजी करत शेकापचे भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली शासनाच्या निषेधार्थ फळे व भाजीपाला फेकून देत शासनाच्या प्रतिकात्मक पुतळ्याला आसुडाचे फटके देत आसूड आंदोलन करण्यात आले. यावेळी लहु सोळंके, मुंजा पांचाळ, कडाजी नावडकर, रोहन आकुसकर, मोहन इंगळे, रंजित जाधव, अमोल गोले, भालचंद्र सोळंके, गणेश सोळंके व आभिजीत आठवे यांची उपस्थिती होती.



# अधिकाराचा गैरवापर
## ऋतुजा आनंदगावकर पायउतार

### ढोरगाव पाठोपाठ मंजरथच्या महिला सरपंचांवर अपात्रेची कारवाई

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील मंजरथ येथील सरपंच ऋतुजा राजेंद्र आनंदगावकर यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करून कर्तव्यात कसूर केल्याचे सिद्ध झाल्याने अप्पर विभागीय आयुक्तांचे आदेश रद्द करून आनंदगावकर यांना सरपंचपदावरून अपात्र करण्यात आल्याची कारवाई राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी केली. दरम्यान, अधिकाराचा गैरवापर केल्याप्रकरणी ढोरगावच्या सरपंच यमुना सरवदे यांच्यावर अपात्रेची कारवाई झाल्यानंतर मंजरथच्या सरपंच ऋतुजा आनंदगावकर यांच्यावरही पायउतार होण्याची नामुष्की आली आहे.

ढोरगाव येथील सरपंच यमुना सरवदे या अपात्र ठरल्या होत्या त्याचबरोबर आनंदगावकर या देखील अपात्र ठरल्याने दोन महिला सरपंच घरी बसल्या आहेत. माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे सरपंच म्हणून एरोनॉटिकल इंजिनिअर असलेल्या ऋतुजा



राजेंद्र आनंदगावकर या मागील काही वर्षापासून काम पाहतात. त्यांच्या कारभाराविरुद्ध ग्रामपंचायत सदस्य रघुनाथ राजेभाऊ चुंबळे यांनी आनंदगावकर यांना अपात्र ठरवावे अशी मागणी एका निवेदनाद्वारे विभागीय आयुक्तांकडे केली. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करून आपला अहवाल विभागीय आयुक्तांना सादर केला. अहवालामध्ये मंजरथ हे गाव धार्मिक स्थळ असल्याने या गावात येणाऱ्या वाहनांकडून वसुलीची रक्कम बँकेत भरणा न करणे, रोजंदारीवर मजुरांना रोख रक्कम देणे, सरपंच यांनी कोविडसाठी तीन लाख रुपये खर्च केले असे दाखवले, १४ व्या वित्त आयोगातील रमाई योजना कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत, १४ सप्टेंबर १९ व ऑक्टोबर १९ या सभेच्या इतिवृत्तावर ग्रामसेवक व सरपंच यांची सही नाही, तर गैरहजर असलेले सदस्य बाळू काळे व रघुनाथ चुंबळे यांची नावे सूचक, अनुमोदक अशी दाखवण्यात आली आहेत, असे आरोप करण्यात आले होते. याप्रकरणी २३ जून २० रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुनावणी घेतली. सरपंच गैरहजर असल्याने त्यांचेविरुद्ध अहवाल तयार करून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १६ जुलै २० रोजी विभागीय आयुक्तांना सादर केला.१ जानेवारी २१ रोजी अप्पर विभागीय आयुक्त यांच्या चौकशीत सरपंच, ग्रामसेवक यांनी कागदपत्रे सादर केल्याचे दिसून आले तसेच या प्रकरणात ठोस कारण असल्याशिवाय मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा अहवाल स्वीकारणे आयुक्तांना बंधनकारक नाही. या बाबी विचारात घेता आयुक्तांनी ३९-१ चा अर्ज नामंजूर केला होता.

रघुनाथ चुंबळे यांनी राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे अपील दाखल केले. त्यावर सुनावणी होऊन सरपंचांनी अधिकाराचा गैरवापर करून कर्तव्यात कसूर केल्याचे सिद्ध होते म्हणून अप्पर विभागीय आयुक्तांचे आदेश रद्द करून सरपंच ऋतुजा आनंदगावकर यांना अपात्र ठरवल्याचे आदेश ४ मार्च रोजी बजावण्यात आले आहेत. ही ऑर्डर एप्रिलमध्ये मिळाली आहे.

### दिव्यांगांना पंचायत समितीचा 'आधार'



पात्रुड : दिव्यांग ईसाक बाशामियाँ शेख यांना पंचायत समिती अनुदानामार्फत शिलाई मशिनसाठी धनादेश देताना माजलगाव पंचायत समितीचे उपसभापती डॉ.वसिम मनसबदार.

### 'पोरीधरी'मध्ये तुकाराम कळसाईतकर



माजलगाव : पोरधरी या लघुपटात कलावंत तुकाराम कळसाईतकर यांची लक्षवेधी भूमिका आहे समवेत अभिनेत्री पायल वंजारे.

# एका समाजसेवकाची चटका लावणारी एक्झिट



▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील जेष्ठ समाजसेवक जकी बाबा (वय ४५) यांचे रविवारी रात्री उशिरा औरंगाबाद येथील एका रूग्णालयात निधन झाले. जकी बाबा यांना कोरोना होता, अशी माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, एका समाजसेवकाची ही चटका लावणारी एक्झिट आहे. अशा प्रतिक्रिया विविध स्तरातून उमटल्या आहेत.

जकी बाबा हे लहानपणापासूनच सामाजिक कार्यासाठी ध्येयवेडे होते. जमात इस्लामी हिंद, असोसिएशन फॉर प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राईट्स (एपीसीआर) अशा विविध संघटनांच्या माध्यमातून सामाजिक कार्य त्यांच्या हातून घडले.

समाजातील प्रत्येक घटकांसाठी ते खूप मेहनतीने झटत असत. २०१४ साली लोकसभा निवडणुकीत वेल्फेअर पार्टी ऑफ इंडिया या पक्षाकडून ते बीड लोकसभेचे उमेदवार होते. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, तीन भाऊ, तीन बहिणी असा मोठा परिवार आहे. जकी बाबा यांच्या परीवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

# कोविड रूग्णांसाठी दर्जाहीन जेवण

## माजलगावातील संतापजनक प्रकार; आरोग्य खाते झोपेत

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील शासकीय कोविड सेंटरमध्ये जेवणाअभावी रुग्णांचे हाल होत असल्याचे दिसून येत आहेत. येथील रूग्णांना दर्जेदार, सकस आहार मिळण्याऐवजी अत्यंत निकृष्ट दर्जाचे जेवण येथे दिले जात असल्याच्या तक्रारी होत असताना आरोग्य विभाग मात्र निद्रावस्थेत आहे.

कोरोना साथीने वर्षापासून संपूर्ण थैमान घातले असून या साथीला रोखण्यासाठी देशाचे पंतप्रधान, मुख्यमंत्री यांच्यासह डॉक्टर, प्रशासन, आरोग्य विभाग, पोलीस प्रयत्न करत आहेत. माजलगाव शहराजवळील केसापुरी वसाहत या ठिकाणी चालू करण्यात आलेल्या शासकीय कोविड सेंटरमध्ये देण्यात येणारा आहार हा शासन नियमाप्रमाणे नाही. दोन वेळा आयुर्वेदिक काढा देणे आवश्यक असून, मध, मूगडाळ, पनीर भाजी, फुलका, वरण, भात, चहा, व्हेज पुलाव, हळदी, दूध, ग्रीन टी, इडली-सांभर, फळे, मटकी, सोयाबीन, शेंगदाणा लाडू आदी कोरोना रूग्णांना देणे आवश्यक असताना निकृष्ठ जेवण दिले जात आहे.









आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**